# पारनेर दर्शन

गणपती बाप्पा मोरया

वर्ष १ अंक ३१७, रविवार ८ सप्टेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# इतर आमदारांच्या तुलनेत माझा सर्वाधिक निधी!


## ■ खासदार नीलेश लंके यांचे प्रतिपादन ■ म्हस्केवाडी येथील गणेश मंदिर देवस्थानच्या वतीने सत्कार

म्हस्केवाडी : विशेष प्रतिनिधी

**लोकसभा निवडणूकीत म्हस्केवाडी बरोबरच पारनेर तालुक्यातील जनतेने मला भरघोस मतदान करून स्वाभीमान जपला. तुम्ही तुमचे काम चोख बजावले आता तुमच्या विकास कामांची जबाबदारी माझी असे सांगताना आमदार म्हणून काम करताना आपण साडेचार वर्षात १ हजार ८ कोटींची भरीव निधी आणला असून इतर आमदारांच्या तुलनेत हा निधी सर्वाधिक असल्याचे प्रतिपादन खासदार नीलेश लंके यांनी केले.**

गणेश चतुर्थी निमित्त म्हस्केवाडी येथील स्वयंभू गणेशाचे खा. लंके यांनी दर्शन घेतले. त्यानंतर देवस्थान ट्रस्टच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थितांशी त्यांनी संवाद साधला.

खा. लंके म्हणाले, देवस्थानच्या विश्वस्तांनी थोडया दिवसांत या परीसराचा कायापालट केला आहे. गणेश चतुर्थी निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह तसेच उत्सावाचे नेटके नियोजन करण्यात आले असून धार्मीक वारसा जपणारे म्हस्केवाडी हे गांव आहे. येथील ग्रामस्थ धार्मीक विचारांशी जोडले गेलेले आहेत. यावेळी राष्ट्रवादी आ यटी सेलचे प्रदेशाध्यक्ष जितेश सरडे, नांदूरपठारचे मा. सरपंच रविंद्र राजरदेव, कान्हूरपठारचे उपसरपंच प्रसाद नवले, भाऊ साठे, ॲड. प्रताप जगताप, शुभम शिरोळे, गोविंदशेठ साबळे, भाउशेठ गोरडे, गणेशशेठ गोरडे, डी.के. पानमंद, शिवाजी म्हस्के, गणपत पानमंद, बाळासाहेब म्हस्के, अरूणशेठ गोरडे, किरण पानमंद, माधवराव गोरडे, साहेबराव पानमंद, शिवाजी धोंडीबा म्हस्के, शिवाजी साहेब म्हस्के, सुदाम म्हस्के, सुनील पानमंद आदी उपस्थित होते.



■ गणेश चतुर्थीनिमित्त खा. नीलेश लंके यांनी म्हस्केवाडी येथील स्वयंभू गणेशाचे दर्शन घेत मायबाप जनतेला सुखी ठेवण्यासाठी साकडे घातले.

### अळकुटी चोंभूत रस्त्याचे काम लवकरच

अळकुटी ते चोंभूत या रस्त्याच्या कामासाठी ६० कोटीचा निधी मंजुर झाला असून काही तांत्रीक अडचणीमुळे हे काम रखडले होते. या रस्त्याची काही दिवसांपूर्वी डागडुजी करण्यात आली असली तरी तांत्रीक अडचणी दुर करून हे काम लवकरच पुर्ण करण्याचा शब्द मी या स्वयंभू गणपतीच्या मंदिरात देतो असा शब्द खा. लंके यांनी यावेळी दिला.

### माझी बांधिलकी जनतेशी

विधानसभा निवडणूकीत मतदारांनी मला भरघोस मतांनी विधानसभेत पाठविले. कोरोना संकटात दोन वर्षे गेल्याने निधी मिळण्यात अडचणी आल्या. तरीही आपण जनतेशी असलेली बांधीलकी जपण्याच्या भावनेतून साडेचार वर्षाच्या कालावधीत तब्बल १ हजार ८०० कोटी रूपयांचा निधी मतदारसंघात खेचून आणला. आजवरच्या लोकप्रतिनधींच्या कामांशी तुलन केली तर विक्रम आहे. यापुढील काळातही आपण जनतेच्या विकास कामांसाठी बांधील आहोत.

नीलेश लंके , खासदार

### दिंडी सोहळयाच्या रथाचे लोकार्पण

निर्मलग्राम म्हस्केवाडी ते श्री क्षेत्र आळंदी या श्री गजानन पायी दिंडी सोहळयाच्या रथाचे खा. लंके यांच्या हस्ते यावेळी लोकार्पण करण्यात आले. या रथासाठी गजानन प्रसादिक भजनी मंडख, भाऊ बाबूराव गोरडे, माधव गेणूभाउ गोरडे, गोविंद जनाभाउ साबळे, गोविंद गबाजी दरेकर यांनी योगदान दिले आहे.

### सावळाशेठचे स्वप्न पुर्ण करायचे आहे

स्व.सावळाशेठ पानमंद यांच्याकडून म्हस्केवाडीतील पुलाची मागणी करण्यात आली होती. दुर्देवाने ते आज आपल्यात नाहीत. मात्र या पुलासाठीही मी निधी उपलब्ध करून देणार असून सावळाशेठ यांचे पुलाचे स्वप्न आपण त्यांच्या पश्चात पुर्ण करू अशी ग्वाही खा. लंके यांनी यावेळी दिली.

### १० टक्के रस्त्यांची दुरावस्था

आपण साडेचार वर्षांच्या कालावधीत चांगले काम करण्याचा प्रयत्न केला. बहुतांश रस्त्यांची कामे मार्गी लावली. आजून १० टक्के रस्त्यांची दुरावस्था असून ती देखील दुर होईल. आपण सरकारमध्ये नसल्याने अडचणी निर्माण होतात, मात्र त्यावर मात करून कामे मार्गी लावण्यासाठी आपण नेहमीच प्रयत्नशिल असतो.

### मायबाप जनतेला सुखी ठेव

माझ्या मायबाप जनलेला सुखी ठेव, त्यांच्या चेहऱ्यावर नेहमी हसू असू देत असे साकडे घालत खा. नीलेश लंके यांनी उपस्थित भाविकांना गणेश चतुर्थी व गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

### रक्तदान शिबिराचे कौतुक

एकीकडे धार्मिक उत्सव साजरा होत असताना दुसरीकडे सामाजिक बांधिलकी जपत म्हस्केवाडी ग्रामस्थांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. ग्रामस्थांच्या या बांधिलकीचे खा. लंके यांनी कौतुक केले. रक्तदात्यांची भेट घेत त्यांनाही खा. लंके यांनी शुभेच्छा दिल्या.



■ गणरायाच्या प्रतिष्ठापणेसाठी पारनेर शहरात गणेश मुर्ती, पुजा तसेच सजावटीच्या साहित्याच्या खरेदीसाठी भाविकांनी गर्दी केली होती. ■ गणपती बाप्पाच्या स्वागतासाठी चिमुकल्यांमध्येही उत्साह दिसून आला.

# अखेर पूजा खेडकर सरकारी सेवेतून बरखास्त

## केंद्र सरकारचा महत्त्वाचा निर्णय

मुंबई : प्रतिनिधी



**केंद्र सरकारने वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांना सरकारी सेवेतून बरखास्त करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती आहे. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयील गैरवर्तन व त्यानंतर कागदपत्रांमध्ये आढळलेली अनियमितता या पार्श्वभूमीवर पूजा खेडकर यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. पीटीआयने सुत्रांच्या हवाल्याने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.**

महत्त्वाचे म्हणजे यापूर्वी यूपीएससीकडूनही पूजा खेडकर यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वीच यूपीएससीने त्यांची उमेदवारी रद्द केली होती. तसेच त्यांना यापुढे यूपीएससीकडून घेण्यात येणाऱ्या कोणत्याही परीक्षेमध्ये बसता येणार नाही, असंही यूपीएससीकडून स्पष्ट करण्यात आलं होतं.

**पूजा खेडकर यांच्यावर नेमके आरोप काय?**

पूजा खेडकर यांनी वडिलांची कोट्यवधींची मालमत्ता असूनही क्रिमीलेअर सुविधेचा लाभ घेऊन ओबीसी कोट्यातून अर्ज केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. त्याशिवाय, बेकायदेशीरपणे दिव्यांग असल्याची चुकीची कागदपत्रे सादर केल्याचाही आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

# गणरायाच्या आगमनालाच विघ्न : ई बाईकने घेतला पेट

## ■ दुचाकी जाग्यावर जळून खाक ■ मोठा अनर्थ टळला



सोलापूर : प्रतिनिधी

**गणरायाचे राज्यात मोठ्या उत्साहात आगमन होत आहे. अनेकांची बाप्पाची मुहूर्तावर मूर्तीस्थापन करण्यासाठी एकच लगबग सुरु झाली आहे. सोलापूरात मात्र गणरायांच्या उत्सवाच्या दिवशी एक अपघात घडला.**

लाडक्या बाप्पाला घेऊन जात असताना धावत्या इलेक्ट्रिक दुचाकीने अचानक पेट घेतला आहे. दुचाकी चालकाच्या वेळेत लक्षात आल्यावर, दुचाकी थांबवून बाजूला थांबवण्यात आली. बघता बघता इलेक्ट्रिक वाहनाने अचानक जास्त पेट घेतला. जाग्यावर जळून दुचाकी खाक झाली. चालकाच्या वेळीच लक्षात आल्याने मोठा अनर्थ टळला. सदर घटनेनंतर दुचाकी चालकाने पोलीस प्रशासना आणि अग्निशामक दलाचे आभार व्यक्त केले.

**बाप्पाची मूर्ती घेऊन जाताना**

उर्वरीत पान ३ वर






# अजितदादाचं मुख्यमंत्री होवू दे!

## अमोल मिटकरींचे बाप्पांना साकडे



अकोला : प्रतिनिधी

**संपूर्ण देशभरात आज गणेशोस्तव मोठ्या जल्लोषात साजरा केला जात आहे. प्रत्येकाच्या घराघरात बाप्पाचे आगमन झाले आहे. थोड्याच दिवसांत आगामी विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. त्यामुळे बाप्पाचा आशीर्वाद घेऊन सर्वच राजकीय पक्ष निवडणुकीसाठी मैदानात उतरताना पाहायला मिळणार आहेत. अशातच आता अजित पवार गटाचे नेते आमदार अमोल मिटकरी यांच्या घरीसुद्धा बाप्पाचे आगमन झाले असून २०२४ ला अजित पवार राज्याचे मुख्यमंत्री होऊ दे, असं साकडं मिटकरी यांनी बाप्पाला घातलं आहे.**

**मिटकरी काय म्हणाले?**

अमोल मिकटरी म्हणाले की, सालाबाद प्रमाणे याही वर्षी माझ्या घरी गणपतीचा उत्सव आहे. सर्व धर्म समभाव जपणारा आमचा गणपती आहे. सर्व समाजाची मुलं आमच्या गणपती उत्सवात सहभागी होतात. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दहाव्यांदा राज्याचा अर्थसंकल्प मांडला आहे. त्यामध्ये महिलांसाठी ई -पिंक रिक्षा योजना आहे. मोफत शिक्षणाची सुविधा आहे. शेतकऱ्यांना मोफत विजबील आहे. आणि सर्वात महत्वाची लाडकी बहिण योजना राबवण्यात आली आहे. याच योजनेच्या भरवश्यावर २०२४ ची विधानसभा निवडणूक जिंकून अजितदादा पुढच्यावर्षी मुख्यमंत्री होतील आणि बाप्पाची पूजा करतील.असं मिटकरी म्हणाले आहेत.

उर्वरीत पान ३ वर

# भंडारदरा पाणलोटात पडला ५ हजार ३८ मिमी पाऊस

## निसर्ग सौंदर्याने फुलला घाटघर परिसर

अकोले : प्रतिनिधी

**भंडारदरा धरणाचे पाणलोट क्षेत्रातिल घाटघर येथील पावसाने आज पाच हजार मिमीचा टप्पा ओलांडला. तेथे आजपर्यंत ५ हजार ३८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे हा पाऊस मागील दोन महिन्यांतील आहे. भंडारदराचे पाणलोट क्षेत्रात सर्वच ठिकाणी या वर्षी मुसळधार पाऊस पडला. या पावसामुळे भंडारदरा धरणात क्षमतेच्या जवळपास दुप्पट म्हणजे वीस टीएमसी पाण्याची आजपर्यंत आवक झाली. भंडारदरा धरण महिनाभरापूर्वीपासून भरून वहात आहे.**

सह्याद्रीचे सर्वात उंच शिखर, कळसुबाई आणि रतनगड यांच्या डोंगर रांगेतील अवघे १२२ चौ. कि. भंडारदरा धरणाचे पाणलोट क्षेत्र आहे. या पाणलोटात कोकणकड्यानजीक असणाऱ्या घाटघरचा परिसर



हाअहमदनगरजिल्ह्याची चेरापुंजी म्हणून ओळखला जातो. पावसाळ्यात तेथे सरासरी साडेपाच हजार मिमी. पाऊस पडत असतो. तर पाणलोटात इतरत्र तीन ते पाच हजार मिमी पाऊस पडतो.

भंडारदरा पाणलोटात घाटघर, रतनवाडी, पांजरे व भंडारदरा येथे पर्जन्यमापन केंद्रे आहेत. मात्र भंडारदरा वगळता अन्य तीन ठिकाणचे पर्जन्यमापक बिघडल्यामुळे एक जूनपासून तेथील पावसाचे मोजमाप होऊ शकले नाही. पर्जन्यमापकाच्या दुरुस्तीनंतर घाटघर व पांजरे येथे ५ जुलैपासून तर रतनवाडीला

उर्वरीत पान ३ वर




# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

## UPI App द्वारे सुरक्षित व्यवहारासाठी लक्षात ठेवा 'या' पाच गोष्टी!

**सध्याच्या काळात डिजिटल पेमेंट करण्याचे प्रमाण वाढले आहे. हल्ली प्रत्येकजण जवळ कॅश बाळगण्यापेक्षा ऑनलाईन पेमेंटच करताना दिसून येतो. प्रत्येकजण हल्ली यूपीआयचा वापर करतो. आपल्या फोनमध्ये यासाठी गुगल पे, फोन पे, पेटीएम आणि अन्य ॲप्स असतात. ज्यामधून आपण ऑनलाइन व्यवहार करतो. यूपीआय पेमेंट ही इतर कोणत्याही ऑनलाइन पेमेंट पद्धतीपेक्षा वेगवान आहेत. मात्र जस जसे ऑनलाइन पेमेंटचे प्रमाण वाढले आहे तशी ऑनलाइन फसवणूक करण्याचे प्रमाणदेखील वाढले आहे. ऑनलाईम पेमेंट करणाऱ्यांची फसवणूक करून त्यांचे पैसे चोरण्यासाठी सायबर गुन्हेगार नवनवीन युक्त्या लढवत असतात. त्यामुळेच यूपीआय पेमेंट करत असताना काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. ऑनलाइन पेमेंट करताना कोणत्या प्रकारची काळजी घेतली पाहिजे त्याबद्दल जाणून घेऊयात...**

### विश्वसनीय UPI Apps चा वापर

सध्या ऑनलाइन व्यवहार करण्यासाठी अनेक upi apps उपलब्ध आहेत. त्यामुळे आपण ऑनलाइन पेमेंटसाठी अधिकृत व सुरक्षित यूपीआय App वापरणे आवश्यक असते. लोकप्रिय व सुरक्षित Apps मध्ये सध्या Google Pay, PhonePe आणि Paytm यांचा समावेश आहे. या या ॲप्सना सर्व प्रमुख बँका आणि वित्तीय संस्थांचा पाठिंबा आहे. त्यामुळे तुमचे पैसे सुरक्षित असल्याचा विश्वास तुम्हाला वाटतो.

### UPI पिन कोणालाही सांगू नये

तुमचा upi पिन हा तुमचे पैसे अधिक सुरक्षित ठेवण्यास मदत करतो. त्यामुळे तुमचा पिन सुरक्षित असणे आवश्यक आहे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे तुमचा upi पिन कोणाशीही शेअर करू नये. तसेच एखादी वेबसाइट तुम्हाला अधिकृत वाटत नसेल तर तिथे तुमचा पिन टाकू नये. तसेच तुम्ही तुमचा पिन हा काही कालावधीनंतर बदलत राहणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचे ऑनलाईन पेमेंट करत असताना प्राप्तकर्त्याच्या डिटेल्सची नीट खात्री करणे आवश्यक आहे. यामध्ये प्राप्तकर्त्याचे नाव , UPI आयडी आणि मोबाईल नंबर याचा समावेश होतो. तुम्ही पेमेंट करण्याआधी UPI App वर 'व्हेरिफाय पेमेंट ॲड्रेस' फीचरचा वापर करून प्राप्तकर्त्याची ओळख देखील करू शकता.

### आपले डिव्हाईस सुरक्षित ठेवावे

तुमचे डिव्हाईस हॅकर्स कधीही हॅक करू शकतात. तसे होऊ नये म्हणून सुरक्षेसाठी अँटीव्हायरस किंवा तुमची ऑपरेटिंग सिस्टीम आणि Apps कायम अपडेट ठेवावेत. जेणेकरून तुमचे डिव्हाईस सुरक्षित राहू शकते. तसेच प्रत्येकजण हल्ली सुरक्षेच्या दृष्टीने आपल्या डिव्हाईसला पासवर्ड ठेवत असतो. तो पासवर्ड अधिक स्ट्राँग असणे आवश्यक असते. जेणेकरून तुमचे डिव्हाईस अधिक सुरक्षित राहील.




## जाणून घेऊ 'गूगल पे'बद्दल सर्वकाही...

**एखाद्याला तत्काळ पैसे पाठविणे, वीजबिल भरणे, सिलिंडर बुक करणे आदी अनेक गोष्टींसाठी वापरले जाणारे सर्वांत लोकप्रिय ॲप म्हणजे 'गूगल पे' (Google Pay). अगदी रिक्षात, भाजीविक्रेत्यांकडे ते मॉलमधील प्रत्येक दुकानामध्ये गूगल पे ॲपचा क्यूआर कोड बोर्ड लावलेला तुम्हाला दिसून येईल. अलीकडच्या काळात डिजिटल पेमेंटचा वापर इतका वाढला आहे की, प्रत्येक जण लहान लहान व्यवहार करण्यासाठीही गूगल पे या ॲपचा वापर करताना दिसून येत आहे. त्यामुळे जरी आपण पाकीट घरी विसरलो तरी मोबाईलमध्ये गूगल पे ॲप असले तर कोणालाही चिंता करण्याची गरज भासत नाही. कारण या ॲपमुळे तुम्ही कधीही, कुठेही व कोणत्याही वेळी झटपट व्यवहार करू शकता. पण, तुम्ही कधी विचार केला आहे की, हे 'गूगल पे' ॲप लाँच करण्याची मूळ कल्पना कोणाची असेल? हे ॲप भारतात कधी लाँच झाले असेल? तर आपण याविषयी अधिक जाणून घेणार आहोत...**

'गूगल पे' ॲपची स्थापना २६ मे २०११ रोजी झाली. अगदी सुरुवातीला या डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्मचे नाव बदलून ११ सप्टेंबर २०१५ रोजी 'ॲण्ड्रॉइड पे' ठेवण्यात आले. त्यानंतर २८ ऑगस्ट २०१८ रोजी 'गूगल पे' या नावाने लाँच होण्यापूर्वी हे ॲप 'तेज' (Tez) या नावानेसुद्धा लाँच करण्यात आले होते. गूगलद्वारे विकसित करण्यात आलेली गूगल पे ही सेवा डिजिटल वॉलेट कम ऑनलाइन पेमेंट प्रणाली म्हणून काम करते. हे ॲप वापरकर्त्यांना ॲण्ड्रॉइड फोन, स्मार्टवॉच व टॅबलेटद्वारे ऑनलाइन पेमेंट, खरेदी, तर विविध बँकांद्वारे लोन काढण्यासाठीसुद्धा परवानगी देते. आयओएस (IOS) हे आणखी एक प्लॅटफॉर्म आहे; जे भारत आणि युनायटेड स्टेट्समध्ये काही अटींसह वापरकर्त्यांना गूगल पे वापरण्याची परवानगी देतो.



### 'गूगल पे' ची कामगिरी

- गूगलच्या डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्म गूगल पेने भारतात पदार्पण केल्यापासून अवघ्या दोन वर्षांत ६७ मिलियन ॲक्टिव्ह युजर्स गाठले.
- गूगल पेने २०१९ मध्ये डिजिटल व्यवहारांमध्ये ५९ टक्के योगदान दिले होते.
- फोन पेनंतर गुगल पे हे दुसरे सर्वात लोकप्रिय यूपीआय प्लॅटफॉर्म आहे.



### बँक खाते गूगल पेवर कसे जोडायचे?

- स्क्रीनच्या वरच्या उजव्या कोपऱ्यात प्रोफाइल आयकॉनवर टॅप करून, गूगल पे खात्याचा तपशील उघडा.
- तुमचे बँक खाते जोडण्यासाठी 'पैसे पाठवा'वर टॅप करा.
- तुमच्या बँकेचे नाव शोधा आणि ओपन करा.
- तुमच्या बँक खात्याशी संबंधित तुमचे सिम कार्ड निवडा.
- तुमच्या बँक तपशिलांची पडताळणी करण्यासाठी गूगल पे तुमच्या निवडलेल्या सिम कार्डवरून एक समर्पित एसएमएस पाठवेल आणि व्यवहार करण्यासाठी ते प्राथमिक बँक खाते म्हणून सेट करील.
- तुम्ही गूगल पेमध्ये एकापेक्षा जास्त बँक खाती जोडू शकता आणि व्यवहार करण्यासाठी खाते स्विचसुद्धा करू शकता.

### गूगल ॲपचा शोध कोणी लावला?

- गूगल पे ॲपचा शोध सुजित नारायणन आणि सुमित ग्वालानी यांनी लावला. गूगल पे ॲपचे सह-संस्थापक सुजित नारायणन यांच्या म्हणण्यानुसार, 'गूगल तेज'वर काम करताना त्यांना आणि त्यांच्या टीमला असे जाणवले की, ग्राहकाचा आर्थिक प्रवास डिजिटल पेमेंटच्या पलीकडे आहे. त्यामुळे ही बाब लक्षात घेता, भारतातील वापरकर्त्यांना पैशांची देवाणघेवाण करण्यासाठी किंवा हाताळण्यासाठी एक नवीन, जलद व कार्यक्षम मार्ग प्रदान करणे अत्यंत गरजेचे आहे. तेव्हा या संस्थापक जोडीने 'गूगल पे' नावाने ॲप लाँच करण्याचा निर्णय घेतला; जे वापरकर्त्यांना हजारो वर्षांसाठी आर्थिक सेवा पुरवेल.
- सुजित नारायणन : सुजित नारायणन आणि सुमित ग्वालानी हे गूगल पेचे सहनिर्माते आहेत. सुजित हे अनुभवी पेमेंट्स एक्झिक्युटिव्ह आहेत आणि त्यांना वित्तीय सेवा क्षेत्रांचा अनुभव आहे. सुजित हे वाराणसी येथील कालिकत आणि महात्मा गांधी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांनी स्टॅण्डर्ड चार्टर्ड बँकेतून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. सुजित यांनी सात वर्षांनंतर संस्थेच्या राष्ट्रीय विक्री व्यवस्थापकीय पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर गूगल कंपनीत प्रवेश करण्यापूर्वी ते रेलिगेअर मॅक्वेरी प्रायव्हेट वेल्थचे उपाध्यक्ष होते. त्यांनी मार्केटिंग आणि चॅनेल डेव्हलपमेंटमध्येही काम केले आहे.
- सुमित ग्वालानी : गूगल पेचे सह-संस्थापक सुजित नारायणन यांच्याबरोबर सुमित ग्वालानी यांची हे ॲप सुरू करण्यात महत्त्वाची भूमिका आहे. त्यांनी गूगल तेजचे भारतातील कामकाज हाताळले. सुमित यांनी गूगल कंपनीमध्ये १२ वर्षांपेक्षा अधिक काळ काम केले आहे. गूगल कंपनीमध्ये प्रवेश करण्यापूर्वी कोलंबिया विद्यापीठ, सांता बार्बरा येथे ते संशोधन सहायक होते. सुमित ग्वालानी हे मुंबई विद्यापीठात कम्प्युटर इंजिनियरिंगचे विद्यार्थी होते. सांता बार्बरा या विद्यापीठातून त्यांनी संगणक विज्ञान विषयात पदव्युत्तर शिक्षण घेण्यापूर्वी बी.टेक. पदवी पूर्ण केली.

### गूगल पे हे ॲप इतर ऑनलाइन पेमेंट ॲपच्या तुलनेत अधिक का वापरले जाते?



इकॉनॉमिक्स टाइम्स यांनी दिलेल्या माहितीनुसार या ॲपमध्ये वापरकर्त्यांसाठी सोईस्कर अशी अनेक फीचर्स आहेत. व्यवहार झटपट होतात. पैसे थेट बँक खात्यात पाठविले आणि प्राप्त केले जाऊ शकतात. या ॲपद्वारे लहान वा मोठे सर्व व्यवहार करता येतात. गूगल पे ॲप आठ भारतीय भाषांमध्ये उपलब्ध आहे. ॲप वापरकर्त्यांना एकापेक्षा अधिक पेमेंट पर्यायदेखील प्रदान करते. याचा अर्थ वापरकर्ते त्यांच्या मोबाइल नंबरद्वारे किंवा व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस (VPAs)द्वारे व्यवहार करू शकतात. वापरकर्त्यांचे सगळ्यात आवडते फीचर म्हणजे 'स्क्रॅच कार्ड'. गूगल पे विविध व्यवहारांवर आकर्षक कॅशबॅक आणि ऑफर प्रदान करते. हे कॅशबॅक थेट लिंक केलेल्या बँक खात्यात जमा होतात. गूगल पेच्या सर्व खास वैशिष्ट्यांमुळे ऑनलाइन व्यवहारांसाठी वापरले जाणारे गूगल पे हे लोकप्रिय ॲप आज प्रत्येक भारतीयाच्या मोबाईलमध्ये दिसू लागले आहे.

### गूगल पे : नाव, लोगो अन् टॅगलाइन...

सुरुवातीला या ॲपचे नाव गूगल पे ( Google pay ) असे होते आणि ॲपच्या लोगोची डिझाइन एका बाजूला गूगलचा (Google) 'जी' (G); तर दुसऱ्या बाजूला 'पे' (Pay), असे इंग्रजी मजकुरात लिहिण्यात आले होते. त्यानंतर काही वर्षांनी या ॲपचे नाव बदलून 'जी पे' (G Pay); तर लोगो बदलून 'जी' व 'यू' G आणि U इंटरलॉक करण्यात आला आहे. तसेच यामध्ये लाल, पिवळा, हिरवा व निळा हे रंग लोगोसाठी वापरण्यात आले आहेत. 'मनी मेड सिंपल' ही गूगल पेची टॅगलाईन आहे. म्हणजेच गूगल पे वापरकर्त्यांचा पैशांची देवाणघेवाण करण्याचा मार्ग अधिक सोपा करते.

### 'गुगल पे'ची आव्हाने...

जगातील सर्वात मोठ्या संस्थांपैकी एक असणाऱ्या गूगल कंपनीच्या पाठिंब्यामुळे गूगल पेची सुरुवात करताना छोट्या-उद्योजकांना आणि स्टार्टअप्सना ज्या समस्यांना सामोरे जावे लागते त्या समस्यांना या संस्थापक जोडीला तोंड द्यावे लागले नाही. कोणत्याही साधनांची कमतरताही भासली नाही. अगदी कोणत्याही आव्हानांना सामोरे जावे लागले नसले तरी २०२० मध्ये गूगल पेच्या ॲपवरील तांत्रिक बिघाड हा काही काळासाठी ट्रेंडिंग विषय ठरला होता. अनेक वापरकर्त्यांनी गूगल पे ॲपची तक्रारदेखील नोंदवली होती. प्रकरण असे होते की, काही गूगल पे युजर्सची बँक खाती कोणतीही सूचना न देता गूगल पेवरून काढून टाकण्यात आली होती. या प्रकरणाच्या तक्रारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर वारंवार पोस्ट केल्या जात होत्या. याप्रसंगी गूगल पे टीमने सुचवले की, ॲपवर बँक खाती लिंक करताना वापरकर्त्यांबरोबर नकळत झालेली एखादी कृती असू शकते. गूगल पे टीमने यावर उपाय शोधून काढला आणि परिस्थिती पूर्ववत झाली.



## इलेक्ट्रिक बाइक आणि स्कूटरमध्ये या पाच कारणांमुळे लागते आग, तुम्हीही घ्या काळजी...

**देशात एका बाजूला इलेक्ट्रिक वाहनांसाठी मागणी वाढत आहे, तर दुसऱ्या बाजूला इलेक्ट्रिक वाहनांमध्ये लागणाऱ्या आगीच्या घटना हे सरकार आणि वाहन उत्पादक कंपन्यांसमोरचं मोठं आव्हान आहे. छत्रपती संभाजीनगरात इलेक्ट्रिक स्कूटरला चार्जिंग करताना आग लागून इमारतीत पसरली. यात ७ जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर पुन्हा इलेक्ट्रिक वाहनांमध्ये आग लागणं, बॅटरीचा स्फोट होणे या कारणांची चर्चा होत आहे. नागरिक इलेक्ट्रिक वाहन खरेदी करावं की करू नये याबाबत संभ्रमावस्थेत आहेत...**

- शॉर्ट सर्किट : इलेक्ट्रिक वाहनांना आग लागण्याची अनेक कारणं आहेत. आम्ही तुम्हाला अशी पाच कारणं सांगणार आहोत ज्यामुळे ईव्हीला आग लागू शकते. चार्जिंग स्टेशनवर वाहन चार्जिंगला लावलेलं असताना आग लागण्याच्या घटनांमध्ये बाइक आणि स्कूटींमध्ये शॉर्ट सर्किट होणं हे सर्वात मोठं कारण आहे. जर बॅटरीचा जॉइंट टाईट नसेल तर शॉर्ट सर्किटची शक्यता वाढते. इलेक्ट्रिक टू व्हीलरमध्ये, सात किलोवॅटपर्यंतचे चार्जर वापरले जातात. हे चार्जर कधीकधी इतके पॉवरफुल ठरतात की त्यांच्या वापरामुळे बॅटरीमध्ये शॉर्ट सर्किट होण्याची शक्यता निर्माण होते.
- तापमानामुळे बॅटरी गरम होणे : भारतातल्या अनेक भागांमध्ये खूप गर्मी असते. अनेक राज्य आणि शहरांमध्ये कमाल तापमान हे ३४ अंश सेल्सिअसच्या पुढे जातं. यामुळे दुचाकी वाहनांसमोर काही अडचणी निर्माण होतात. बहुतांश दुचाकींमध्ये बॅटरी ही सीटच्या खाली असते आणि गर्मीमध्ये उन्हात वाहन उभ करणं ही खूप मोठी जोखीम ठरू शकते. उन्हात दुचाकी उभी केल्याने बॅटरी खूप गरम होते. अशातच तुम्ही दुचाकी सुरू केली तर किंवा चार्जिंगला लावली तर बॅटरीचा स्फोट होण्याची किंवा बॅटरी पेटण्याची शक्यता वाढते.



- बॅटरीचं तापमान वाढणं धोकादायक : इलेक्ट्रिक स्कूटरमध्ये इंधनाच्या जागी वापरलं जाणारं लिथियम आणि सामान्य स्कूटरमध्ये वापरली जाणारं गॅसोलिन हे ज्वलनशील असतं. गॅसोलिन २१० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमानात पेटू शकतं. तर लिथियम १३५ अंश सेल्सिअत तापमानात आग पकडू शकतं. चार्जिंगला लावल्यानंतर बॅटरी तापते, किंवा उन्हात वाहन उभं केल्याने बॅटरी तापते. त्यामुळे तुमच्याकडे इलेक्ट्रिक वाहन असेल तर या वाहनाची काळजी घ्यायला हवी. किमान ही वाहनं दुपारच्या कडक उन्हात उभी करू नयेत.
- कंपन्यांनी हीट सिंकचा वापर कमी करणं : बॅटरीतून मोठ्या प्रमाणात उष्णता बाहेर पडते. त्यामुळे बॅटरीचं कव्हर म्हणजेच बाहेरचं आवरण मजबूत असलं पाहिजे. तसेच या आवरणामध्ये हीट सिंकचा वापर व्हायला हवा. मीडिया रिपोर्ट्सनुसार असं केल्यास बॅटरीचं वजन वाढतं आणि त्यानंतर बॅटरी एका ठिकाणाहून दुसरीकडे नेणं अवघड होतं. त्यामुळे बॅटरीचं वजन कमी ठेवण्यासाठी कंपन्या हीट सिंकचा वापर करत नाहीत, किंवा खूप कमी वापर करतात. स्वॅपेबल बॅटरी बनवताना हे मोठं आव्हान असतं. परिणामी बॅटरीचं तापमान नियंत्रणात राहात नाही.
- दुसऱ्या चार्जरचा वापर : बऱ्याच जणांना माहिती आहे की, एका मोबाईलचा चार्जर दुसऱ्या फोनला वापरू नये. कारण त्यामुळे बॅटरी फुटण्याची शक्यता असते. हाच नियम इलेक्ट्रिक वाहनांना देखील लागू पडतो. आगीच्या अनेक दुर्घटनांमध्ये असं निदर्शनास आलं आहे की इलेक्ट्रिक वाहन चार्ज करण्यासाठी योग्य चार्जरचा वापर केला गेला नव्हता. वाहनांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या आणि क्षमतेच्या बॅटरींचा वापर केला जातो. या बॅटरी चार्ज करण्यासाठी ठराविक चार्जरचा वापर केला जातो. मात्र तुम्ही दुसऱ्या चार्जरने तुमचं इलेक्ट्रिक वाहन चार्ज करत असाल तर धोका वाढतो.

### घराच्या बाहेर स्वतंत्र सॉकेट करा

सद्यःस्थितीत वाहनांना चार्जिंग करताना वायर लांब नेत घराच्या आत असलेल्या सॉकेटवरच चार्जिंगला लावले जाते. त्यामुळे शॉटसर्किट किंवा बॅटरीचा स्फोट झाल्यास तो थेट घरात पोहचतो. त्यामुळे काही अंशी धोका टाळण्यासाठी चार्जिंगसाठी घराच्या बाहेर मुख्य दरवाजापासून दूर अंतरावर एक वेगळे योग्य पॉवरचे स्वतंत्र सर्किट बसवणे हिताचे ठरते. यामुळे दुर्घटना घडल्यास मोकळ्या जागेत व बाहेरील बाजूला असल्याने घरातील सदस्यांना बाहेर पडणे सोपे जाईल.

## शॉर्ट न्यूज

### म्हातारपिंप्री गावच्या उपसरपंचपदी तावरे

■ **श्रीगोंदा :** म्हातारपिंप्री (ता. श्रीगोंदा) ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी महेश मोहन तावरे यांची बिनविरोध निवड झाली. ते राजेंद्र नागवडे यांचे समर्थक आहेत. प्रीती अनिल पोकळे यांनी उपसरपंचपदाचा राजीनामा दिला. या जागेवर निवडणूक प्रक्रिया सरपंच ज्योत्सना देविदास हिरडे व ग्रामविकास अधिकारी स्वाती लामकाने यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. प्रामाणिकपणाने काम केल्याने नागवडे कारखान्याचे माजी संचालक विलास वाबळे यांनी महेश तावरे यांना उपसरपंचपदाची संधी दिली. बापूसाहेब हिरडे परिस्थितीचा अंदाज घेऊन दोन पाऊले मागे घेतले.

### अभिनेता अनासपुरे यांनी घेतले शनीदर्शन

■ **नेवासा :** मराठी सिने अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी नेवासा तालुक्यातील शनिशिंगणापूर येथे शनिदर्शन घेतले. यावेळी मकरंद अनासपुरे यांनी शनि देवाच्या अभिषेक करून तेल अर्पण करून विधीवत पूजा केली. त्यानंतर जनसंपर्क कार्यालयात शनेश्वर देवस्थानचे अध्यक्ष भागवत बानकर यांनी त्यांचा शाल, शनी प्रतिमा देऊन सन्मान केला. परिसरात झालेल्या सुधारणा व पानसतीर्थ प्रकल्पाची अनासपुरे यांनी प्रशंसा केली आणि शनिदर्शनामुळे मनाला ऊर्जा मिळत असल्याचे सांगितले. यावेळी आदर्श गाव गोगलगावचे माजी सरपंच योगेश म्हस्के उपस्थित होते.

### जिल्हाधिकारी यांनी घेतला योजनांचा आढावा

■ **कोपरगाव :** जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर व इतर मागास बहुजन कल्याणचे संचालक राधाकिसन देवडे यांनी नुकतीच कोपरगाव तालुक्यातील रांजणगाव देशमुख ग्रामपंचायतीस भेट देऊन पंतप्रधान विश्वकर्मा विकास योजना तसेच मुख्यमंत्री वयोश्री योजनेच्या लाभार्थी नोंदणी बाबतच्या कामकाजाचा आढावा नुकताच घेऊन समाधान व्यक्त केले. यावेळी कोपरगावचे गटविकास अधिकारी श्रीकृष्ण पाठक, नायब तहसीलदार प्रफुल्लीता सातपुते तसेच ग्रामविकास अधिकारी नारायण खेडकर यांनी योजनेच्या कामकाजाबाबत माहिती दिली.

### वैद्यकीय अधिकाऱ्यावर कारवाई करावी

■ **कर्जत :** जिल्हा रुग्णालयामध्ये वयोवृद्ध व्यक्ती अपंग प्रमाणपत्र घेण्यासाठी आलेले असताना वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी न करताच कागदपत्रे फेकून देत धक्काबुक्की करून रुग्णालयाबाहेर काढण्याची घटना घडली असून, या प्रकरणी जिल्हा शल्यचिकित्सकांनी संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यावर कारवाई करावी, अशी मागणी नवनाथ नरसिंहराव तनपुरे या वृद्ध व्यक्तीने जिल्हा शल्यचिकित्सकांकडे पत्राद्वारे केली आहे.

### सेव्ह गर्ल, सेफ गर्ल अभियानाचा शुभारंभ

■ **नगर :** सेव्ह गर्ल सेफ गर्ल, मुली वाचवा सुरक्षित ठेवा, या राज्यव्यापी अभियानाचा शुभारंभ रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ चे प्रांतपाल डॉ. सुरेश साबू व निर्मला साबू यांच्या हस्ते शहरातील आयएमए भवन येथे झाला. याप्रसंगी अभियानाच्या अध्यक्षा डॉ. सुधा कांकरिया, उपप्रांतपाल प्रसन्ना खाजगीवाले, उपप्रांतपाल पुरुषोत्तम जाधव, रोटरी क्लब ऑफ अहमदनगरचे अध्यक्ष नितीन थाडे, सचिव सुभाष गर्जे, माजी अध्यक्ष डॉ. प्रकाश कांकरिया, माधवराव देशमुख, रवींद्र राऊत, आदी ठोंबे, आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

# माझ्या विरोधात निवडणूक लढवून दाखवावी !

## जरांगे पाटलांना भुजबळांचे ओपन चॅलेंज



**नाशिक : प्रतिनिधी**

**मराठा नेता मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर राज्य सरकारला इशारा दिला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांचे ११३ आमदार पाडू, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला दिला आहे. त्यांच्या या इशाऱ्यानंतर मंत्री छगन भुजबळ यांनी जरांगे पाटील यांच्यावर टीका करत त्यांना थेट माझ्या विरोधात निवडणूक लढवून दाखवावी असे आव्हान देखील केले आहे.**

छगन भुजबळ म्हणाले, रोज रोज भूमिका बदलत बसण्यापेक्षा मनोज जरांगे यांनी २८८ उमेदवार उभे करून दाखवावेत. प्रत्येक वेळी भूमिका बदलण्याचे कारण काय? कधी ते उपोषणाला बसतात, दुसऱ्या दिवशी उठतात. आता म्हणतात मुस्लिम समाजाला आरक्षण मिळवून देऊ. पण मुस्लिमांना २५ वर्षांपूर्वीच आम्ही आरक्षण दिले आहे. पण जरांगे पाटील अर्धवट ज्ञानाच्या आधारे बोलतात. आता ते शेतकऱ्यांच्या प्रश्नावर पुढे येत आहेत. त्यांनी एकच काहीतरी करावे, असे आवाहन छगन भुजबळ यांनी केले आहे. ते एका वृत्तवाहिनीला मुलाखत देत असताना बोलत होते.

छगन भुजबळ यांना निवडणुकीत पाडू, असे विधान मनोज जरांगे यांनी केले होते. यावर छगन भुजबळ म्हणाले, मला पाडण्यापेक्षा जरांगेंनी माझ्याच विरोधात निवडणूक लढवावी. मला निवडणुकीत पाडले तरी माझा आवाज बंद होणार नाही. मला मागच्या पाच दशकांपासून संघर्ष करायची सवय आहे. येवला मतदारसंघात कोणीही येवो, पण मी लाखभर मतांनी निवडून येणार. जरांगे पाटलांनी एकच भूमिका घ्यावी आणि मग बोलावे, अशी टीका भुजबळ यांनी केली आहे.

मनोज जरांगे पाटील आता २९ सप्टेंबरपासून पुन्हा एकदा उपोषणाला बसणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. मराठा आरक्षण मिळवण्यासाठी आता हे शेवटचे उपोषण असणार असल्याचे त्यांनी सांगितले. उपोषणाला बसण्याआधी राज्य सरकारने मराठा अरक्षणावर तोडगा काढावा, अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे.

# कुस्ती व तायक्कांदो स्पर्धेत विद्याधाम प्रशालेचे यश

## तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत विद्यार्थी चमकले



**शिरूर : प्रतिनिधी**

**तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धा आंबळे ता.शिरूर या ठिकाणी पार पडल्या.या स्पर्धेत विद्याधाम प्रशालेचे दोन खेळाडू जिल्हास्तरावर निवड झाली.चौदा वर्ष वयोगटामध्ये फ्री स्टाईल कुस्ती प्रकारात निल महेंद्र सोनार आणि एकोणीस वर्षे वयोगटात ग्रीको रोमन कुस्ती प्रकारात संस्कार निलेश येलभर या दोन खेळाडूंनी तालुकास्तरावर यश मिळवून दोघांची जिल्हास्तरावर निवड झाली.**

त्याचप्रमाणे तायक्कांदो स्पर्धेत चौदा वर्षे वयोगटात सोहम पोटे गोल्ड मेडल,आयुषी जीवाडे ब्रॉझ मेडल,पुजा पांढरे सिल्व्हर मेडल मिळाले तसेच सतरा वर्षे वयोगटात धनश्री मचाले गोल्ड मेडल मिळाले. या खेळाडूंना क्रिडा विभाग प्रमुख सचिन रासकर, क्रिडा स्पर्धा प्रमुख भास्कर करंजुले,संदीप तानवडे व शरद दरवडे यांनी मार्गदर्शन केले.

यशस्वी खेळाडूंचे व मार्गदर्शक शिक्षकांचे प्रशालेचे प्राचार्य गुरूदत्त पाचर्णे, पर्यवेक्षक दिगंबर नाईक, मच्छिंद्र बनकर, चंद्रकांत देविकर तसेच संस्थेचे अध्यक्ष अनिल बोरा, सचिव नंदकुमार निकम, शालेय समितीचे अध्यक्ष धरमचंद फुलफगर यांनी अभिनंदन केले.

## वाचकांच्या लेखणीतून

# वृकयुद्ध

लांडग्यांची दहशत कायम या मथळ्याखाली एक वृत्तपत्रीय बातमी वाचनात आली. उत्तर प्रदेशच्या बहराइच (शहरा)वर भीतीचे सावट पसरले असून मुलांनी शाळांकडे पाठ फिरवली आहे. हे लांडगे आसपासच्या गावांतून मुलांना भक्ष्य म्हणून ओढून



नेतात. एका मजूराची मुलगी लांडग्याने पळवून नेल्याने तो कामावर जायचे धाडस न करता कुटुंबातील माणसांचे रक्षण करण्यासाठी घरीच थांबला आहे म्हणे.

भयभीत लोकांच्या लाठ्याकाठ्यांनाही हे लांडगे दाद देत नाहीत. परिणामतः लांडग्यांचे साहस वाढल्याने त्यांनी उच्छाद मांडलेला दिसतो. उत्तर प्रदेशचे वनमंत्री अरुण सक्सेना यांनी नऊ शूटर्सचे पथक नागरिकांवर हल्ला करणाऱ्या हिंस्त्र प्राण्यांना गोळ्या घालून मारण्यासाठी तैनात केले आहे. तसेच इतर हल्लेखोर प्राण्यांना पकडण्याचे आदेशही दिल्याचे कळते.

मनुष्यप्राणी निसर्गातील पशू,पक्षी आणि कीटकांपासून काही ना काही शिकत आलेला आहे. कावळ्यासारख्या पक्षाकडून मानव आपल्या आरोग्याच्या लाभाखातर प्राणायामाचा अभ्यास शिकला. पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर यांच्या योगसाधन की तय्यारी या हिंदी ग्रंथात याचा उल्लेख आहे.

कुंभारीण या कीटकापासून मनुष्य ॲनास्थेशिया किंवा भुलीचे तंत्र शिकला. यासंबंधी नागपूर तरुण भारत दैनिकात मार्च २०23 मध्ये मी एक लेख वाचला होता. (त्यावर निसर्गच आपला गुरु मथळ्याचे माझे एक पत्रही प्रकाशित झाले होते). लांडगा हा पशू फार युध्दनिपुण असतो. कौटिल्याच्या अर्थशास्त्र या संस्कृत ग्रंथात युध्दाच्या डावपेचांचे वर्णन केलेले आढळते. त्यात वृकयुद्ध नीतीचा (पध्दतीचा) उल्लेख आहे. संस्कृत भाषेत वृक म्हणजे लांडगा. टोळीतील सगळे शिकारी लांडगे आपल्यापैकी एकाला मध्यभागी मुंढीपर्यंत पुरतात. मग हरणासारख्या सावजाला मध्यभागी घेरतात. ते सावज बिचारे या हिंस्त्र लांडग्यांच्या तावडीतून जीव वाचविण्यासाठी इकडून तिकडे, तिकडून इकडे धावत राहते. कधी कधी सावज पुरलेल्या लांडग्याच्या डोक्यावरूनही धावण्याचा प्रयत्न करते. अर्थात सावजाला पुरलेल्या लांडग्याची गणवार्ताही नसते. अशा बेसावध क्षणी तो पुरलेला लांडगा सावजाचा पाय आकळून धरतो. मग घेराव घालणारे लांडगे एकसाथ त्या सावजावर तुटून पडतात. काहीजण पुरलेल्या लांडग्यालाही मोकळे करतात. तोही सावजावर तुटून पडतो. यातून खिंडीत गाठवून शत्रूची कत्तल कशी करावी, हे युध्दतंत्र मनुष्य शिकला. त्यालाच कौटिल्य वृकयुद्ध म्हणतो.

■ नाना ढवळे
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

(पान १ वरून)

## गणरायाच्या आगमनालाच विघ्न : ई बाईकने घेतला पेट

**मोठा अनर्थ टळला**

सोलापूर शहरातील मार्कंडेय जलतरण तलावानजीक शनिवारी सकाळी अक्षय जगन्नाथ(राहणार, सोलापूर) भावासह आणि छोट्या मुलांसह बाप्पाची मूर्ती घेऊन घराकडे निघाले होते. दुचाकी वाहन चालवत असताना, धावत्या इलेक्ट्रिक वाहनातून धूर निघू लागला. इतर वाहनधारकांनी लक्षात आणून दिल्यावर अक्षय जगन्नाथ यांनी बाप्पाची मूर्ती घेऊन,भाऊ आणि मुलाला घेऊन दुचाकी रस्ताच्या एका बाजूला थांबवली. दुचाकीवर बसलेले सर्व रस्ताच्या एका बाजूला उभे राहिले. बघता बघता इलेक्ट्रिक दुचाकीने पेट घेतला. दुचाकीला भीषण आग लागली, रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनधारकांची अंतर ठेवून वर्दळ सुरु होती. काही वेळातच दुचाकी वाहन जळून खाक झाले.

**वाहनात ठेवलेली रक्कम जळून खाक**

घटनेची माहिती मिळताच स्थळी अग्निशामक दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. आग आटोक्यात आणताच गाडी क्रमांक एम एच १३ डीझेड ८९३३ सदर गाडीची अक्षय जगन्नाथ यांनी पोलीसांना माहिती दिली. लहान मुलाला कपडे आणण्यासाठी दुचाकी वाहनाच्या डिकीत बारा हजार रुपयांची रोकड जमा करण्यात आली होती. अचानक आग लागल्याने गाडीत कपडे आणि गौरीसाठी ठेवलेले १२ हजार रुपये गाडीच्या डीकीत जळून नष्ट झाले. सदर घटेनत कुठलीही जीवित हानी झाली नसून मात्र इलेक्ट्रिक बाइकला आग लागल्याने एकच खळबळ उडाली आहे. घटनास्थळी पोलिस दाखल झाले आणि इलेक्ट्रिक बाईक जाळल्याची माहिती संबंधित शोरुमला देण्यात आल्याची माहिती दुचाकी चालकांनी दिली आहे.

## भंडारदरा पाणलोटात पडला ५ हजार ३८ मिमी पाऊस

६ जुलैपासून पर्जन्यमापन सुरू झाले. ५ जुलै ते ७ सप्टेंबरपर्यंतच्या ६५ दिवसांत घाटघर येथे ५ हजार ३८ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

चार ऑगस्टला घाटघर येथे ४७५ मिमी पावसाची नोंद झाली. हा एका दिवसातील तेथील सर्वाधिक पाऊस. घाटघर येथे प्रत्येकी एक दिवस चारशे व तिनशे मिमीपेक्षा जास्त तर तीन दिवस दोनशे मिमीपेक्षा अधिक पाऊस तेथे कोसळला.

घाटघरचा हा परिसर, तेथील कोकणकडा, त्या लगतची दरी हा सर्व परिसर पावसाळ्यात दिवसातील बराच वेळ दाट धुक्यात हरवलेला असतो. दाट धुक्याच्या सोबतीने टपोऱ्या थेंबांनी ओघळणारा पाऊस अनुभवायला पावसाळ्यात तेथे पर्यटकांचा ओघ सुरू असतो. भंडारदराचे पाण्याचा लाभ नगर जिल्ह्यातील अकोले, संगमनेर, श्रीरामपूर, रहाता या तालुक्यांना मुख्यतः होतो. रतनगडावर अमृतवाहिनी म्हणून ओळखली जाणारी प्रवरा नदी उगम पावते. या गडाच्या पायथ्याशी असणाऱ्या रतनवाडीमध्येही घाटघरसारखाच पाऊस पडत असतो. या वर्षी ६ जुलैपासून तेथील पर्जन्याचे मोजमाप सुरू झाले. सहा जुलै ते ७ सप्टेंबर या कालावधीत रतनवाडीला ४ हजार ६२० मिमी पाऊस कोसळला. ४ ऑगस्टला घाटघर प्रमाणेच येथेही ४४९ मिमी असा विक्रमी पाऊस पडला आहे.

रतनवाडी येथे अकराव्या शतकातील प्राचीन शिवमंदिर आहे. तर रतनवाडीच्या वाटेवर अनेक नयनरम्य धबधबे पावसाळ्यात कोसळत असतात. त्या मुळे घाटघर भंडारदराला भेट देणारे पर्यटक आवर्जून रतनवाडीचीही वाट पकडतात. ३ हजार ९०६ मिमी पावसाची नोंद झालेल्या पांजरे येथेही घाटघर रतनवाडी सारखाच पाऊस पडला.

पाणलोटातील या मुसळधार पावसामुळे ११ हजार ३९ दशलक्ष घनफुट क्षमतेच्या भंडारदरा धरणात आजपर्यंत क्षमतेपेक्षा कितीतरी जास्त म्हणजे २० हजार ६२९ दशलक्ष घनफुट नवीन पाणी आले. धरणातील पाणी पातळी नियंत्रणासाठी ३ ऑगस्टपासूनच धरणाच्या सांडव्यातून नदीपात्रात पाणी सोडले जात आहे. आज भंडारदरा धरणाचा जलसाठा शंभर टक्के आहे. नुकतेच या धरणाचे आद्य क्रांतिकारक वीर राघोजी भांगरे जलाशय असे नामकरण करण्यात आले आहे.

भंडारदरा धरणातून प्रवरा नदीत सोडलेले पाणी याच तालुक्यात असणाऱ्या निळवंडे धरणात जमा होते. आजपर्यंत ८ हजार ३२० दशलक्ष घनफुट क्षमता असणाऱ्या निळवंडे धरणात १९ हजार ६८६ दशलक्ष घनफुट नवीन पाणी जमा झाले. निळवंडे धरणात आज ९८.७७ टक्के पाणीसाठा होता. गत महिनाभरापासून निळवंडे धरणातून जायकवाडीसाठी कमी अधिक प्रमाणात विसर्ग सुरू आहे. प्रवरा समूहातील आढळा (क्षमता १०६० दशलक्ष घनफुट) आणि म्हाळुंगी नदीवरील भोजापूर (क्षमता ३६१ दशलक्ष घनफुट) ही दोन्ही छोटी धरणेही भंडारदरा प्रमाणेच शंभर टक्के भरली आहेत.

## अजितदादाचं मुख्यमंत्री होवू दे!

**बारामतीमध्ये झळकले होते बॅनर**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांची बारामतीमध्ये जन सन्मान यात्रा दाखल झाली होती. त्यावेळी सुद्धा फिक्स मुख्यमंत्री, भावी मुख्यमंत्री म्हणून अजित पवार यांचे बॅनर झळकले होते. अजित पवार हे सत्तेत सहभागी झाल्यापासून त्यांच्या मुख्यमंत्री होण्याबाबतच्या चर्चा आहेत. अनेक वेळा अजित पवार यांनी देखील बोलवून दाखवलेलं आहे. परंतु अद्याप तरी ते शक्य झाले नाही. त्यामुळे आता आगामी विधानसभेत जास्तीत जास्त जागा जिंकून मुख्यमंत्रिपदावर दावा ठोकू शकतात.

दरम्यान, आज राज्यभरात गणपती उत्सव साजरा होत आहे. विशेषत: पुणे आणि मुंबई सारखी शहरे अक्षरक्ष: बाप्पाच्या भक्तीमध्ये तल्लीन झाले आहेत. ढोल ताशाच्या गजरात बाप्पा घरोघरी विराजमान झाला आहे. संपूर्ण राज्यभरात आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरुन पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. २९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी / अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
आमची वैशिष्ट्ये
- १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
- एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
- प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
- मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
- अत्याधुनिक व सुसज्ज अशी अभ्यासिका
- PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
- पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
ॲडमिशन ओपन
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# निघोजच्या न्यु इंग्लिश स्कूलचे घवघवीत यश

## ■ तालुकास्तरीय कब्बडी स्पर्धा ■ सलग पाचव्यांदा यश



■ तालुका क्रीडा स्पर्धेत न्यू इंग्लिश स्कूल विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करीत यश संपादन केले.

**प्रत्येक क्रीडा स्पर्धा या अतिशय उत्साहात होत असतात यामध्ये बाबासाहेब कवाद ग्रामविकास सेवाभावी संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी प्रामुख्याने सहभागी होत असतात विशेष करुण संस्थेचे सचिव व मार्गदर्शक वसंत कवाद यांना क्रिडा स्पर्धेविषयी मोठ्या प्रमाणात आवड आहे. आपल्या विद्यालयाचा संघ प्रत्येक क्रिडा स्पर्धेत सहभागी झाला पाहिजे यासाठी ते आग्रही असतात म्हणून आजपर्यंत झालेल्या प्रत्येक क्रीडा स्पर्धेत न्यू इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी क्रीडा प्रकारात यशस्वी झाले आहेत.**

**प्राचार्य डायस सर**

◣ निघोज : प्रतिनिधी

**पारनेर येथे तालूकास्तरीय कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.या कबड्डी स्पर्धेत बाबासाहेब कवाद न्यु इंग्लीश मेडीअम स्कुलने आपला सहभाग नोंदवला होता.यात १४ वर्ष वयोगट व १७ वर्ष वयोगटातील मुलींनी सहभाग घेतला होता.**

तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा पारनेर येथील किसान इंटरनॅशनल स्कूल येथे आयोजित करण्यात आले होत्या .या स्पर्धेमध्ये बाबासाहेब कवाद न्यू इंग्लिश मेडियम स्कूल १४ वर्षे वयोगटातील मुलींनी कर्जुले हर्या या संघावर १० गुणांनी विजय मिळवला, व न्यू इंग्लिश मीडियम स्कूल १७ वर्षे वयोगटातील मुलींनी न्यू इंग्लिश स्कूल हंगा या संघाबरोबर १५ गुणांनी विजय मिळवला १७ वर्षे वयोगटातील मुलींनी कबड्डी स्पर्धेत सलग पाचव्या वर्षी प्रथम क्रमांकावर विजय मिळवला आहे.१७ वर्षे वयोगटातील मुलींचे नेतृत्व अनुष्का गायकवाड तर १४ वर्षे वयोगटातील मुलींचे नेतृत्व आकांक्षा घुले हिने केले.

या विजय संघाला शाळेचे प्राचार्य श्री डायस सर ,व्यवस्थापन प्रतिनिधी सौ संगीता कवाद मॅडम, क्रीडा शिक्षक मांडगे सर, मोरे मॅडम ,खोडदे मॅडम यांचे मार्गदर्शन मिळाले .

या दोन्ही संघांचे श्री बाबासाहेब संस्थेच्या न्यू इंग्लिश मेडियम स्कूलचे अध्यक्ष शांताराम कळसकर , उपाध्यक्ष प्रकाश कवाद, सचिव वसंत कवाद सर आणि बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव थोरात, मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय लंके, वरिष्ठ अधिकारी सुनील तांबे तसेच सर्व संचालक मंडळाने या दोन्ही संघांचे कौतुक केले.

# बाभुळवाड्यात शिवतेज गणेश मंडळाच्या बाप्पाची जोरदार प्रतिष्ठापना

## अयोध्याच्या राममंदिराचा उभारला देखावा

◣ बाभुळवाडा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील बाभुळवाडे येथील शिवतेज गणेश मंडळाच्या सदस्यांनी व पदाधिकारी यांनी शनिवार दि. ७ रोजी सकाळी नऊ वाजता शिवतेज फॉर्म हाऊस परिसरात गणेश मुर्तीची भव्य वाजत गाजत मिरवणूक काढीत दहा वाजता शिवतेज मंडळाच्या सभागृहात गणपती बाप्पाची विधीवत पूजा करीत प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी गणपती बाप्पाच्या जयजयकाराने परिसर निनादून गेला होता.**



■ बाभुळवाडा येथील शिवतेज गणेश मंडळाच्या गणपती बाप्पाची प्रतिष्ठापना करण्यात आली.

**शिवतेज मंडळ प्रत्येक वर्षी गणेश मंडळांच्या माध्यमातून धार्मिक व ऐतिहासिक तसेच सामाजिक देखावे उभे करीत भावीकांचे लक्ष वेधून घेत असते. या मंडळाचे भव्य सभागृह यामध्ये असलेला भव्य मंडप केलेली विद्युत रोषणाई सर्वांचेच लक्ष वेधून घेत असते यावर्षी मंडळाने अयोध्यातील श्रीराम मंदीर देखावा उभा केला असून हा देखावा तयार करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच महिला भगीनी यांनी मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले आहेत. अयोध्या मंदिराच्या कार्यक्रमाची झलक संपुर्ण जगाने अनुभवली असून येथील अयोध्या मंदिराचा देखावा पाहण्यासाठी तालुक्यातून गर्दी होणार आहे.**

यावेळी शिवतेज मंडळाचे अध्यक्ष ॲड. कृष्णाजी जगदाळे तसेच पदाधिकारी व सदस्य तसेच महिला भगिनी व ग्रामस्थ यांच्या हस्ते गणपती बाप्पाची प्रतिष्ठापना करण्यात आली. शिवतेज मंडळाच्या वतीने प्रत्येक सणासुदीला धार्मिक उपक्रम करीत या मंडळाच्या माध्यमातून हिंदू संस्कृतीला पाठबळ देण्याचे काम सातत्याने होत असते. सर्वधर्मसमभाव या सामाजिक कार्यातून शिवतेज मंडळाचे काम बाभुळवाडा परिसरात मोठ्या प्रमाणात सुरू असल्याने तालुक्यात या मंडळाचा नावलौकिक झाला आहे.

तब्बल अकरा दिवस विविध स्पर्धा तसेच गुणवंत विद्यार्थी तसेच समाजातील सेवाभाव करणाऱ्या व्यक्तींचा सत्कार तसेच पारनेर तालुक्यातील विकासकामांना व सामाजिक कार्यात सहभागी होऊन तालुका विकासासाठी योगदान देणाऱ्या व्यक्ती व पत्रकार मित्रांचा सत्कार करून त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. प्रत्येक दिवशी स्पर्धात्मक कार्यक्रम तसेच सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन शिवतेज मंडळ गणेशोत्सवाची शोभा वाढवीण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे.

या कार्यक्रमास तालुक्यातील जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन शिवतेज मंडळाचे अध्यक्ष ॲड. कृष्णाजी जगदाळे व पदाधिकारी व सदस्य, महिला भगिनी तसेच ग्रामस्थ यांनी केले आहे.

# आद्यक्रांतिकारक उमाजी नाईक हे स्वातंत्र्याचे पाईक

## गोरख घोलप यांचे प्रतिपादन



◣अळकुटी : प्रतिनिधी

**भारताच्या इतिहासात अनेक ऐतिहासिक घटना घडल्या आहेत काहींची नोंद झाली, काहींची दखलच घेण्यात आली नाही. सन १८५७ च्या उठावाअगोदरही अनेक उठाव झाले अशाच पहिल्या उठावाद्वारे इंग्रजांना सलग १४ वर्ष सळो की पळो करून सोडणारे व सर्वप्रथम क्रांतीचे स्वप्न पाहणारे महाराष्ट्रातील निधड्या छातीचे वीर आद्यक्रांतिकारक म्हणजे नरवीर राजे उमाजी नाईक होय. क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांचे कार्य मरावे परि क्रांतिरूपे उरावे असे आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे म्हणूनच असे म्हणावे वाटते की, आद्यक्रांतिकारक उमाजी नाईक हे स्वातंत्र्याचे पाईक आहेत असे प्रतिपादन कार्यालय अधीक्षक गोरख घोलप यांनी केले.**

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी येथे नरवीर राजे उमाजी नाईक यांच्या २३३ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रा. अर्जुन चाटे अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी मच्छिन्द्र म्हस्कुले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. दुग्धशर्करा योग असा की, याप्रसंगी महाविद्यालयात गणरायाच्या मूर्तिची लेझीम व ढोलताशासह वाजत-गाजत प्रस्थापना करण्यात आली यावेळी सहकारातून समृद्धीकडे असा उत्कृष्ट देखावा विद्यार्थ्यांनी तयार करून योग्य असा संदेश दिला.

याप्रसंगी प्रा. संजय जाधव, डॉ. शांताबाई थोरात, प्रा. रावसाहेब झावरे, प्रा. शर्मिष्ठा बोरुडे, डॉ. कुंदा कवडे, प्रा. सुनिता जाधव, प्रा. पोपट सुंबरे, प्रा. विनायक सोनवणे, प्रा. संदीप गेटम, प्रा. मोहन माने, प्रा. सचिन बलसाने, प्रा. अमोल नालकर, प्रा. पूजा वैरागर, प्रा. पांडुरंग उघडे, प्रा. अनुराधा गाढवे, प्रा. राजाराम गोर्डे, सूर्यमाला भोर, सुनिता भालेराव, नितीन घोलप, विकास सोनवणे, छाया म्हस्के, राहुल बोरुडे, सागर शितोळे, मनोहर कनिंगध्वज, मच्छिन्द्र म्हस्कुले, रवींद्र वाघ, वैजनाथ आवारी, शिवाजी कळंबे, पांडुरंग शिरोळे तसेच सर्व प्राध्यापक प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.स्वाती फापाळे यांनी प्रास्ताविक केले तर प्रा. विशाल रोकडे यांनी आभार मानले.

# जास्त अडचणींचा सामना करतो तो अधिक यशस्वी होतो

## डीवायएसपी संपतराव भोसले यांचे प्रतिपादन

◣ निघोज : प्रतिनिधी

**जास्त अडचणींचा सामना करतो तो माणूस अधिक यशस्वी होतो हा आपला अनुभव असून आत्मविश्वास व जिद्द जीवनातील महत्वपूर्ण बाबी असून यशस्वी होण्यासाठी स्वयंपुर्ण राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन डीवायएसपी संपतराव भोसले यांनी व्यक्त केले आहे.**



■ निघोज येथील मुलिका देवी महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन डीवायएसपी संपतराव भोसले यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन करण्यात आले या वेळी मान्यवर उपस्थित होते.

श्री मुलिकादेवी महाविद्यालय निघोज येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन नगर ग्रामीणचे उपविभागीय पोलिस अधिकारी संपतराव भोसले यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या भोसले यांनी स्पर्धा परीक्षांच्या महत्वावर आणि या मार्गदर्शन केंद्राच्या उपयुक्ततेवर भर देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सहदेव आहेर होते.

डॉ.आहेर यांनी आपल्या प्रास्ताविकातून महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेतला आणि स्पर्धा परीक्षांमध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल अभिमान व्यक्त केला. मार्गदर्शन केंद्राच्या माध्यमातून अधिकाधिक विद्यार्थ्यांना यशस्वी होण्याच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात महाविद्यालयातील आजी-माजी गुणवंत विद्यार्थ्यांचा, ज्यांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन केले आहे, त्यांचा सहकुटुंब सन्मान करण्यात आला. या विद्यार्थ्यांनी त्यांच्या यशस्वी वाटचालीचे अनुभव सांगितले आणि इतर विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. त्यामध्ये कु. गुप्ता सोनी - मुंबई पोलीस, कु. कोमल बोचरे - ठाणे ग्रामीण पोलीस, कु. पायल साळवे - ठाणे शहर पोलीस, कु. साक्षी पळसकर - ठाणे शहर पोलीस, कु. संकेत गाडीलकर - राष्ट्रीय क्रिकेट खेळाडू तसेच दहावी व बारावी या वर्गात विशेष यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा व पालकांचा देखील गौरव करण्यात आला, ज्यांनी त्यांच्या मुलांच्या यशामध्ये मोलाची भूमिका बजावली आहे.

व्यासपीठावरून बोलताना पुढे भोसले म्हणाले, मुलांसाठी आई-वडील आपल्या जीवाचं रान करत असतात. खेडेगावातील सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयातून, समाजातून, कुटुंबातून अधिक सोयी सुविधा मिळत आहेत. उच्चशिक्षित तरुणांना फक्त ठरवायचं आहे की आपल्याला आयुष्यात नेमकी काय करायचे आहे. आपले पुढे कोणते भविष्य असणार आहे. यासाठी आत्मविश्वास, ध्येय निष्पत्ती, ज्ञानाचा योग्य वापर असणे आवश्यक आहे. आपण शेती, स्पर्धा परीक्षा, खेळाडू असे कोणतेही क्षेत्र निवडा त्या क्षेत्रात स्वतः ला मनापासून झोकून द्या. कोणतेही काम किंवा क्षेत्र कधीच कमी नसते. आपल्या शिक्षणाशी, प्रयत्नांशी प्रामाणिक राहा. यश तुमचेच आहे. आपल्यात जर कष्ट करण्याची मानसिकता, चिकाटी असेल तर आपल्या पाठीशी उभे राहणारे अनेक मदतीचे हात पुढे येत असतात. अभ्यासात सातत्य असेल तर यश हमखास मिळते. आई वडील नेहमी आपल्या पाठीशी असतात परंतु तुमचं योगदान तितकं जास्त असलं पाहिजे. मुले यशस्वी झाले तर आई-वडिलांचा, शिक्षकांचा आनंद द्विगुणित होत असतो. मोबाईलचा गैर वापरामुळे गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे, चोरीच्या प्रमाणात खूप वाढ झाली आहे. महिलांविषयीच्या तक्रारी वाढल्या आहेत. फसवणूक करणारी माणसे आपल्या आसपास असतात. आपल्याला त्यांचे निरीक्षण करता आले पाहिजे.

मिरवणुका, सार्वजनिक उत्सव, राजकीय सभा यावर अशा अनेक कारणांसाठी आपण एकत्र येत असतो. अशा कार्यक्रमांमधून शांतता राखणे, कोणत्याही कार्यक्रमाला वाद होणार नाही यासाठी आपण आपले आयुष्य काळजीपूर्वक जगले पाहिजे. सतर्क असणे अत्यंत गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना गैरप्रकारातून स्वतःला अलिप्त ठेवणे व स्वतःचे भविष्य घडविण्यासाठी तत्पर राहणे महत्त्वाचे आहे. अपयश आयुष्यात येतात, त्यातून परत सकारात्मक होऊन स्पर्धेत उतरता आले पाहिजे. फक्त शिकत राहणे याला काही उपयोग नाही, स्वप्न पाहून त्याकडे वाटचाल करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. स्वतः जवळचा आत्मविश्वास हा नेहमी माणसाला पुढे नेतो. असे त्यांनी प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आनंद पाटेकर यांनी उत्कृष्टपणे पार पाडले, तर आभार प्रदर्शन प्रा. मेहबूब इनामदार यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी पारनेर पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक समीर बारवकर, महाविद्यालयाचे उपप्राचार्य, डॉ. मनोहर एरंडे, समन्वयक प्रा. नूतन गायकवाड, मुख्याध्यापक के. बी. शिंदे, प्रा. किरण पाडळकर तसेच महाविद्यालय व माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षक वृंद, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला असून, विद्यार्थ्यांसाठी नवी दिशा देणारा ठरला.

# दत्तात्रय वराळ यांचे निधन

◣ निघोज : प्रतिनिधी



**निघोज येथील दत्तात्रय तुकाराम वराळ पाटील यांचे नुकतेच वयाच्या ५९ व्या वर्षी हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले. वराळ हे मुंबई येथे व्यवसाय निमित्ताने कार्यरत होते.**

अतिशय मनमिळाऊ स्वभावाचे वराळ यांचा स्वभाव अतिशय नम्र होता. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ, पुतणे, सुना असा मोठा परिवार आहे. मुंबई येथे नामांकित कंपनीत कार्यरत असणारे सुधीर वराळ व स्मिता निलेश लेंडे यांचे ते वडील होत. तसेच वराळ भावकीचे ज्येष्ठ कारभारी व माजी ग्रामपंचायत सदस्य भास्करराव वराळ, डॉ. राजाराम वराळ व भरत वराळ ,जयश्री निवृत्ती पानमंद यांचे ते ज्येष्ठ बंधू होत.

# ज्येष्ठ वृत्तपत्र छायाचित्रकार दत्ता इंगळे यांचे निधन

◣ नगर (प्रतिनिधी)-

**शहरातील ज्येष्ठ वृत्तपत्र छायाचित्रकार दत्ता इंगळे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मागील दोन ते तीन आठवड्यापासून आजारी असल्याने ते पुणे येथील रुग्णालयात उपचार घेत होते. शनिवारी (दि.७ सप्टेंबर) त्यांची प्राणज्योत माळवली. ते ५७ वर्षाचे होते.**



चिचोंडी पाटील (ता. नगर) मुळ गाव असलेले इंगळे अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून येऊन त्यांनी शहरात वृत्तपत्र छायाचित्रकार म्हणून काम सुरु केले होते. गेल्या तीन दशकापासून त्यांनी वृत्तपत्र छायाचित्रकार क्षेत्रात योगदान देऊन आपला नावलौकिक मिळवला. छायाचित्रकारासह बातमीदार म्हणूनही ते कार्यरत होते. छायाचित्रणातील विविध राज्यस्तरीय व राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार देखील त्यांना मिळाले आहेत. त्यांच्या निधनाने एक चांगला वृत्तछायाचित्रकार हरपला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# एमईटी स्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा

◣सुपा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील सुपा येथील माऊली एज्युकेशन ट्रस्टच्या एमईटी इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये गुरूवारी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.**

**याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष अनिकेत पठारे सर, देशमुख सर (प्राचार्य कृषी विद्यालय), प्राचार्या सौ. मोनाली अनिकेत पठारे मॅडम, उपप्राचार्या सौ. अनिता शर्मा मॅडम तसेच सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.**



■ सुपा येथील एमईटी इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.(छाया :शरद रसाळ, सुपा)


## विद्यार्थ्यांनी व्यक्त केली शिक्षकांप्रती कृतज्ञता

सदर कार्यक्रमाची सुरुवात अनिकेत पठारे व सौ.मोनाली पठारे मॅडम यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलित करून डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यादरम्यान पूजनामुळे कार्यक्रमाचे वातावरण मंगलमय झाले.

सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून शिक्षकांचे महत्त्व सांगितले. तसेच इ.८वी आणि इ.४वी च्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले व त्यामधून शिक्षकांचे महत्त्व सांगितले.

शिक्षकांमधून महेश साबळे सर, सौरव पवार सर आणि सुरेश खेत्रे सर यांनी आपल्या भाषणातून शिक्षकांचे महत्त्व सांगितले. त्यांनी शिक्षकाच्या योग्य मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील बदलांविषयी बोलले. त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या आज्ञेचे पालन करण्याचे महत्त्व पटवून दिले.

या उत्सवाने विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षकांप्रती आदरभावना जागी झाली तर शिक्षकांच्या शिकवणीचे महत्त्व अधोरेखित केले. हा कार्यक्रम अतिशय यशस्वी आणि प्रेरणादायक ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरजु शेख आणि स्नेहल मांडगे ह्या विद्यार्थिनींनी केले. त्यांनी आपल्या ओजस्वी निवेदनाने कार्यक्रमाला रंगत आणली. कार्यक्रमाच्या शेवटी शिवराज मैड यांने आभार प्रदर्शन व्यक्त केले.




'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com

'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)

Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com